


# 3 वे कॉर्डिंग फुटचा

## ह्या शिकवणीमध्ये तुम्ही उषा 3 वे कॉर्डिंग फुटचा वापर करण्यास शिकाल.




नावाप्रमाणेच, हा फुट तुम्हाला एका सरळ रेषेत किंवा गुंतागुंतीच्या सजावटी डिझाईन्समध्ये तीन सुरेख दोऱ्यांवर एकाच वेळी शिवण्यास मदत करतो.

सर्वप्रथम आपण त्या सर्व वस्तू गोळा करूया ज्या ह्या पाठाकरिता आवश्यक आहेत – होय, तुम्हाला गरज पडेल उषा जानोम कॉर्डिंग फुट, दोऱ्या – एकाच रंगाच्या किंवा विविध रंगी असू शकतात, शिवण्याचा धागा – हा सुद्धा सारख्याच रंगाचा किंवा, तुम्हाला रंगांची विषमता खुलून दाखवायची असेल, तर वेगळा रंग वापर आणि सर्वात शेवटी पण सर्वात महत्त्वाचा म्हणजे कपड्याचा तुकडा ज्यावर तुम्ही तुमच्या कॉर्डिंगची पहिली फेरी करणार आहात.



दोरीला कपड्याच्या लांबीइतके 4 वेळा मोजा आणि कापा. बाकी असलेल्या इतर दोन दोऱ्यांचे सुद्धा असेच माप घ्या. तुम्ही बघू शकता त्याप्रमाणे आपण दोन पिवळ्या दोऱ्या आणि एक हिरवी दोरी ह्या शिकवणीसाठी वापरणार आहोत.
तसे – 3 वे कॉर्डिंग फुट वापरण्यासाठी तुम्हाला नेहमी 3 दोऱ्या वापरण्याची गरज नाही – तुम्ही एक किंवा दोन किंवा तीन दोऱ्यांचा वापर एकावेळी करू शकता जो तुम्हाला हवा असलेल्या प्रभावावर अवलंबून आहे.



लिव्हरचा वापर करून साध्या प्रेसर फुटला मोकळं करा आणि 3 वे कॉर्डिंग फुट जोडा.















मी कशाप्रकारे पहिला दोरा क्लीपच्या खालून घालून त्याला पहिल्या खोबणीत घातला आहे, याचे अनुसरण करा. खोबणीत घालण्यासाठी तुम्हाला कदाचित त्याला एक हळुवार हिसका द्यावा लागेल...हीच प्रक्रिया दुसऱ्या आणि तिसऱ्या दोऱ्याला अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या खोबणीत घालण्यासाठी करा. तुमच्याकडे तिन्ही दोऱ्या समान लांबीच्या, साधारणपणे काही इंच लांब, फुटच्या मागे.... अशाप्रकारे असल्याचे पाहा.

आता फुट वापरण्यास तयार आहे... परंतु शिवण्यास सुरुवात करण्यापूर्वी – तुमची मशीन सेट करून घ्या – पॅटर्न सेलेक्टर डायलवर ‘डी’ स्टीच निवडा आणि स्टीचची लांबी 2 निवडा.

नंतर कपड्याचा तुकडा कॉर्डिंग फुटच्या खाली ठेवा आणि फुट खाली करा. शिवण्यासाठी आतुर झालात ना?? आता वेळ झाली आहे शिवण्यास सुरुवात करण्याची. दुसऱ्या टोकाला पोहोचल्यावर थोडी जादा दोरी सोडून बाकी कापून टाका.

हे मुलभूत कॉर्डिंग होतं – तुम्ही आता तुमच्या कॉर्डिंग पद्धतींना उठाव देण्यासाठी विविध स्टिचेसचा वापर करून पाहू शकता. आपण लगेच दुसरं करून पाहूया...

स्ट्रेच स्टीच किंवा SS खुणेवर डायल फिरवा आणि स्टीच ‘डी’ निवडा. तुमचे कापड फुटखाली ठेवा आणि पूर्वीप्रमाणेच शिवण्यास सुरुवात करा, पण आता एका वेगळ्या स्टीच सोबत. पूर्ण झाल्यानंतर जादा सोडलेले दोऱ्यांचे टोक कापून टाका.

एक डिझाईनचा घटक म्हणून कॉर्डिंग कशालाही त्रिआयामी उभारी देते – नॅपकिन पासून उशांच्या खोळांपासून वस्त्रांपर्यंत – ते टेक्स्चर इफेक्ट जोडते जे, चांगल्याप्रकारे वापरल्यास जरा नाटकीय दिसू शकते. अपेक्षा आहे तुम्हाला हा पाठ आवडला असेल – आता तुमच्याकडे असलेले सगळे साधे कपडे काढून आणा आणि त्यांना सजवा...जर तुम्हाला तुमचे कपडे मुलभूत आणि एकरंगी आवडत असतील – तर तुमच्यासाठी एकाच रंगाच्या दोऱ्यांचा वापर करून उभारी देण्यापेक्षा इतर काही पर्याय उपयोगी नाहीत – ते व्यक्तीमत्वात अभिजातता आणते. आणि ज्यांचे हृदय बोहेमियन आहे – सुंदर आणि धाडसी परस्परविरोधी रंग निवडा आणि तुमची स्वतःची अभिव्यक्ती निर्माण करा.

आता वेळ आहे मजा करण्याची... कॉर्डिंगच्या शुभेच्छा !